# ‘बर्ड्स ऑफ गोवा’ मधून ४५० पक्ष्यांची माहिती

## पर्यटनमंत्री दिलीप परुळेकर यांचे प्रतिपादन




'बर्ड्स ऑफ गोवा' या पुस्तिकेचे प्रकाशन करताना पर्यटनमंत्री दिलीप परुळेकर. सोबत आमदार नीलेश काब्राल. निखिल देसाई, अजय सक्सेना, अमेय अभ्यंकर, विक्रम ग्रेवल व सावियो फोन्सेका. (छाया : तुळशीदास राऊळ)

**पणजी, दि.१० (प्रतिनिधी)**
गोव्यात पर्यटकांना समाधान देणाऱ्या अनेक गोष्टी आहेत. अशा गोष्टी टप्प्याटप्प्याने शोधून त्याच्याकडे पर्यटकांना आकर्षित करण्याचे कार्य पर्यटन खात्याने सुरू केले आहे. त्यामुळेच गेल्या साडेतीन वर्षांत खात्याला तब्बल ३० पुरस्कार प्राप्त झाले आहेत. गोव्यात असलेल्या ४५० जातीच्या पक्ष्यांची माहिती गोवकरांनाही नव्हती. 'बर्ड्स ऑफ गोवा' या पुस्तिकेच्या माध्यमातून ती होणार आहे, असे प्रतिपादन पर्यटनमंत्री दिलीप परुळेकर यांनी केले. पर्यटन खाते व बर्ड्स इन्स्टिट्यूट ऑफ गोवा यांनी संयुक्तपणे पणजी येथे आज आयोजित कार्यक्रमात पक्षिमित्र विक्रम ग्रेवल व सावियो फोन्सेका यांनी तयार केलेल्या 'बर्ड्स ऑफ गोवा' या छायाचित्र मार्गदर्शक पुस्तिकेचे प्रकाशन केल्यानंतर पर्यटनमंत्री दिलीप परुळेकर बोलत होते. या वेळी पर्यटन विकास महामंडळाचे अध्यक्ष आमदार नीलेश काब्राल, प्रधान मुख्य वनसंरक्षक गोवा अजय सक्सेना, पर्यटन खात्याचे संचालक अमेय अभ्यंकर, व्यवस्थापकीय संचालक निखिल देसाई व पक्षी छायाचित्रकार विक्रम ग्रेवल व सावियो फोन्सेका उपस्थित होते. गोव्यातील पक्ष्यांची माहिती गोव्यात लाखोंच्या संख्येने येणाऱ्या पर्यटकांना मिळावी यासाठी ही पक्षी छायाचित्र मार्गदर्शक पुस्तिका तयार केल्याची माहिती निखिल देसाई यांनी दिली. सूत्रसंचालन डॉ. दीपा कामत यांनी केले.

> “ फक्त बीच टुरिझम नव्हे तर अन्य विभागाकडेही आता पर्यटक आकर्षित होत असून 'बर्ड्स ऑफ गोवा' हे पुस्तक गोव्यात पर्यटन वाढीसाठी उपयुक्त ठरणार आहे.
> **नीलेश काब्राल,**
> आमदार

> “ पक्ष्यांची स्थाने संरक्षित करण्याबरोबरच कारमळी तळ्याचे संरक्षण करण्यात येणार आहे.
> **अजय सक्सेना,**
> प्रधान मुख्य वनसंरक्षक गोवा